ePaper

## ‘INDIA’ नावाचा अयोग्य वापर; 26 विरोधी पक्षांविरोधात दिल्लीत गुन्हा



वर्ष - 7 । अंक -79 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- ललित कला अकादमीसाठी ‘साकडे’
- रिया चक्रवर्तीला मोठा दिलासा!
- अश्विन जडेजाचा दबदबा
- मुंबईत पावसाचा हाहाकार

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 20 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पिंपरी-चिंचवड भाजपचे मिशन लोटस

# अबकी बार 125 पार!

## » शहराध्यक्षपदी शंकर जगताप यांची नियुक्ती: एकजुटीने निवडणुकीला सामोरे जाण्याचा निर्धार

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप आणि आमदार महेश लांडगे यांनी ज्यापध्दतीने पिंपरी चिंचवड शहरात पक्ष संघटना वाढवण्याचे कार्य केले, त्याच प्रमाणे मी देखील पक्षवाढीचे काम करणार असल्याचा विश्वास भाजपाचे नवनिर्वाचित शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केला आहे. त्याचबरोबर आगामी महापालिका निवडणुकीत “अबकी बार १२५ पार” जागा मिळवत निर्विवाद सत्ता कायम ठेवणार असल्याचा दावा जगताप यांनी केला आहे. पिंपरी चिंचवड भाजपाच्या शहराध्यक्षपदी शंकर जगताप यांची आज निवड करण्यात आली आहे. जगताप यांची निवड होताच सर्वच पदाधिकारी कार्यकर्त्यांनी पिंपळे गुरव येथील त्यांच्या कार्यालयाजवळ शुभेच्छा देण्यासाठी मोठी गर्दी केली होती. त्यावेळी शंकर जगताप यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.**



पिंपरी-चिंचवड भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्षपदी माजी नगरसेवक शंकर जगताप यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जगताप यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

दरम्यान, भाजपाच्या शहराध्यक्षपदी शंकर जगताप हेच प्रमुख दावेदार राहतील, असे वृत्त ‘महाईन्यूज’ ने दिले होते. ते तंतोतंत खरे ठरले आहे. भाजपाचे विद्यमान शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांचा शहराध्यक्षपदाचा कार्यकाळ सहा महिन्यांपूर्वी संपला होता. तसेच, शिरुर लोकसभा मतदार संघाच्या निवडणूक प्रमुखपदाची जबाबदारी सोपवली आहे. त्यामुळे नवीन शहराध्यक्ष कोण? याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

राज्यातील पोटनिवडणूक आणि पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकांमध्ये भाजपाची मोठी पिछेहाट सुरू असताना चिंचवडमध्ये केवळ ‘जगताप पॅटर्न’मुळेच पक्षाची पत राहिली. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांचे बंधू शंकर जगताप यांनी अचूक नियोजन करीत महाविकास आघाडीचे तगडे आव्हान रोखले. त्यामुळे या पोटनिवडणुकीत भाजपाचा विजय सोपा झाला. त्यामुळे शंकर जगताप भाजपासाठी ‘संकटमोचक’ ठरले होते. त्याची दखल पक्षश्रेष्ठींनी घेतली आहे. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनापूर्वी त्यांच्यावर सुमारे दोन वर्षे रुग्णालयात औषधोपचार सुरू होते. या काळात वैद्यकीय तज्ञांनी विश्रांतीचा सल्ला दिल्यानंतर जगताप यांना मतदार संघात बाहेर पडता आले नाही. या काळात भाजपाच्या पक्षश्रेष्ठींनी त्यांचे लहान बंधू उद्योजक शंकर जगताप यांच्या खांद्यावर चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी पदाची जबाबदारी सोपवली होती. त्यानंतर शंकर यांनी मतदार संघात मोर्चेबांधणी सुरू केली. दि. ३ जानेवारी २०२३ रोजी लक्ष्मण जगताप यांचे निधन झाले. त्यावेळी कुटुंबाला सावरण्याची मोठी जबाबदारी शंकर जगताप यांच्यावर पडली होती. त्यांनी कुटुंब आणि पक्ष अशी दुहेरी जबबादारी यशस्वीपणे पेलली आणि पोटनिवडणुकीत अश्विनी जगताप यांना विजय मिळला.



> “ पक्षाने माझ्यावर जो विश्वास टाकलेला आहे, तो विश्वास सार्थ करण्याचा मी पूर्ण प्रयत्न करणार आहे. ज्या दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप, आमदार महेश लांडगे यांनी ज्या पद्धतीने पक्ष संघटना वाढवण्याचे काम केलं, त्याचप्रमाणे मी देखील पक्ष संघटना वाढीचे काम करणार आहे.
>
> – शंकर जगताप,
> शहराध्यक्ष, भाजप, पिंपरी-चिंचवड शहर

### काय आहे ‘जगताप पॅटर्न’

» दिवंगत लक्ष्मण जगताप यांनी तब्बल २० वर्षे पिंपरी-चिंचवड शहरात आपल्या नेतृत्वाचा करिष्मा कायम ठेवला आहे. किंबहुना, भारतीय जनता पार्टीचा शहरातील सत्तेचा मार्ग सोपा करण्यात जगताप यांचा सिंहाचा वाटा आहे. महापालिकेतील सत्तेच्या पाच वर्षांच्या काळात जगताप यांनी अपवाद वगळता अनेक समर्थकांना महत्त्वाची पदे दिली आहेत. मतदार संघातील प्रत्येक गावामध्ये जगतापांचा कट्टर समर्थक आहेत. यासह राष्ट्रवादीसह सर्वपक्षीय काही मान्यवर जगताप यांच्यासाठी अप्रत्यक्ष काम करीत असतात. केलेली विकासकामे आणि मतांची अचूक गोळाबेरीज याचा जगताप यांना कायम फायदा होतो. साम, दाम, दंड आणि भेद अशा सर्व आयुधांचा वापर करुन जगताप या मतदार संघाचे अनभिषित्त सम्राट राहिले आहेत. त्यांच्याच तालमीत तयार झालेले शंकर जगताप आहेत. माजी नगरसेवक म्हणून त्यांनी पाच वर्षे सभागृहात कामकाज केले आहे. यासह अत्यंत शांत, संयमी आणि तितकेच अभ्यासू असलेले शंकर जगताप यशस्वी उद्योजक म्हणून ओळखले जातात. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या यंत्रणेतील ‘बॅक बोन’ म्हणून त्यांचा मतदार संघातील बारीक-सारीक गोष्टींत अप्रत्यक्ष निर्णायक हस्तक्षेप असतो. हाच अनुभव शंकर जगताप यांच्या कामाला आला आणि निर्णायक मताधिक्य घेण्यात शंकर जगताप यशस्वी झाले. परिणामी, अश्विनी जगताप या ३६ हजारहून अधिक मतांनी विजयी झाल्या आहेत. आता भाजपा शहराध्यक्षपदाची संधी मिळाल्यामुळे पुन्हा एकदा ‘जगताप पॅटर्न’ पहायला मिळणार आहे.

# पुण्यात दोन दहशतवाद्यांना अटक

## » पुणे पोलिसांची कामगिरी; आरोपींना 25 जुलैपर्यंत कोठडी

### » पकडलेल्या दहशतवाद्यांवर होते दहा लाखांचे बक्षीस

। पुणे/ जेजुरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रीय सुरक्षा एजन्सीने (एनआयए) प्रत्येकी पाच लाखांचे बक्षीस जाहीर केलेल्या दोन फरारी दहशतवाद्यांना पुणे पोलिसांनी अटक केली. ते एप्रिल २०२२ पासून पुण्यातील कोंढवा परिसरात वास्तव्यास असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. नाकाबंदीदरम्यान पोलिसांनी वाहन चोरीच्या संशयावरून ताब्यात घेतल्यानंतर तपासात ही बाब उघड झाली.**




### जयपूरमध्ये रचला घातपाताचा कट

» राजस्थानमधील जयपूर शहरात बॉम्बस्फोट घडविण्याचा कट रचला होता. या कटाची माहिती मिळाल्यानंतर एनआयएने या तिघा दहशतवाद्यांवर प्रत्येकी पाच लाखांचे बक्षीस जाहीर केले होते. 'इसिस' या दहशतवादी संघटनेची उपसंघटना 'सुफा' शी संबंधित असल्याची माहिती प्राथमिक तपासात समोर आली आहे.

### पुण्यात घातपाताचा संशय ?

» दहशतवादी कोणत्या उद्देशाने पुण्यात थांबले होते, त्यांचा कोठे घातपात करण्याचा विचार होता का, याबाबत पुणे पोलिस तपास करीत आहेत. हे प्रकरण एनआयएकडे सोपविण्यात येईल. दहशतवाद्यांना पकडणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांना एनआयएकडून जाहीर केलेले प्रत्येकी पाच लाखांचे बक्षीस मिळेल. शिवाय, पुणे शहर पोलिस दलाकडूनही दोन पोलिसांसह पथकातील कर्मचाऱ्यांनाही बक्षीस देण्यात येणार आहे. या गुन्ह्यातील एका फरारी आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. शहरात सध्या नाकाबंदी आणि कोम्बिंग ऑपरेशन राबविण्यात येत आहे.

न्यायालयाने दोघा आरोपींना २५ जुलैपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. महम्मद इम्रान महम्मद युसूफ खान (वय २३) आणि महम्मद युनूस महम्मद याकू साकी (वय २४, दोघे रा. मीठानगर, कोंढवा, मूळ रा. रतलाम, मध्यप्रदेश) अशी अटक केलेल्या संशयितांची नावे आहेत. त्यांच्याविरुद्ध कोथरूड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस आयुक्त रितेश कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ जुलै रोजी पहाटे पावणेतीनच्या सुमारास कोथरूड पोलिस ठाण्यातील बीट मार्शल प्रदीप चव्हाण आणि अमोल नजन हे गस्तीवर होते.

त्यावेळी त्यांनी दुचाकी चोरी करताना तीन संशयितांना ताब्यात घेतले. आरोपींना घरझडतीसाठी नेले असता त्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. पोलिस पथकाने पाठलाग करून दोघांना ताब्यात घेतले. परंतु त्यांचा साक्षीदार महम्मद शाहनवाझ आलम (वय ३१) हा पसार झाला. पोलिसांनी कोंढव्यातील त्यांच्या घराची झडती घेतली. त्यात एक जिवंत काडतूस, दुचाकी चोरीचे साहित्य, चार मोबाईल आणि लॅपटॉप जप्त करण्यात आला आहे. पोलिसांना आरोपींच्या लॅपटॉपमध्ये काही संशयास्पद कागदपत्रे आढळून आली. त्यावरून त्यांचा देशविघातक कृत्यात सहभागी असल्याचा संशय आला.

पोलिसांनी ही बाब दहशतवाद विरोधी पथकाला (एटीएस) कळविली. एटीएसचे पथक कोथरूड पोलिस ठाण्यात आले. त्यानंतर दोघांना शहर पोलिस दलाच्या गुन्हे शाखेत नेण्यात आले. पोलिस आयुक्त रितेश कुमार, पोलिस सह आयुक्त संदीप कर्णिक यांनी त्यांची चौकशी केली. तेव्हा आरोपी हे मूळ मध्यप्रदेश येथील असून, त्यांचा राजस्थानच्या चितौढगडमधील एका गुन्ह्यात सहभाग असल्याचे स्पष्ट झाले. सुमारे एक वर्षापूर्वी त्याठिकाणी स्फोटके सापडली होती. त्या गुन्ह्यात दोघा संशयितांना एनआयएने फरार घोषित केले होते.

---

# पुणे चक्राकार महामार्गासाठी भूसंपादन प्रक्रियेला गती

## » संमतीकरारनाम्याद्वारे जमीन दिलेल्या शेतकऱ्यांना मोबदला

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेला प्रस्तावित पुणे चक्राकार महामार्ग प्रकल्पाला जिल्हा प्रशासनाच्या गतीमान कार्यवाहीमुळे वेग आला असून बुधवारी या प्रकल्पासाठी संमती करारनाम्याद्वारे जमीन दिलेल्या 14 शेतकऱ्यांना भूमिसंपादनाच्या मोबदल्याचे सुमारे 13 कोटी 82 लाख 90 हजार रुपये इतक्या रकमेचे धनादेश जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांच्याहस्ते प्रदान करण्यात आले.**



जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे (एमएसआरडीसी) अधीक्षक अभियंता राहूल वसईकर, अपर जिल्हाधिकारी हणुमंत अरगुंडे, भूसंपादन (समन्वय) उपजिल्हाधिकारी प्रविण साळुंखे, एमएसआरडीसीचे कार्यकारी अभियंता अजित पाटील आदी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. देशमुख म्हणाले, आजचा दिवस पुणे जिल्ह्यासाठी, राज्यासाठी महत्त्वाचा आहे. एक प्रकारे खऱ्या अर्थाने या प्रकल्पाच्या अंमलबजावणीला आज सुरूवात झाली आहे. हा प्रकल्प राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे.

पुण्यामध्ये वाहतूक कोंडीचा सर्वांनाच त्रास होतो. त्यावर मात करण्यासाठी हा प्रकल्प अतिशय महत्त्वाचा आहे. कोविड काळातही या प्रकल्पासाठी सर्वेक्षण, जमीन मोजणी आदी प्रक्रियेत राज्य रस्ते विकास महामंडळ, महसूल विभाग, भूमि अभिलेख व मूल्यनिर्धारण विभाग यांनी अतिशय सक्षमपणे काम केले आहे.

ही सर्व प्रक्रिया सर्व खातेदारांना विश्वासात घेत अत्यंत पारदर्शकतेने राबविल्याने जमीन देणाऱ्यांना प्रचलित दरापेक्षा कमी मोबदला मिळणार नाही याकडे विशेष लक्ष दिले आहे. शिवाय संमती करारनाम्याद्वारे प्रकल्पासाठी जमीन देणाऱ्यांना एकूण मोबदल्याच्या 25 टक्के अतिरिक्त वाढीव मोबदला दिला जात आहे. शासनाने सुमारे 1 हजार कोटी रुपये भूसंपादनासाठी दिले असून त्यामुळै संमती करारनामे करणाऱ्या शेतकऱ्यांना तात्काळ मोबदला देणे शक्य होत आहे.

### पैशाचे योग्य नियोजन करा

» भूसंपादनातून मिळालेल्या पैशाचे योग्य नियोजन करण्याचा सल्लाही जिल्हाधिकारी डॉ. देशमुख यांनी शेतकऱ्यांना दिला. मोठ्या प्रमाणात मिळालेल्या रकमेचा भविष्यासाठी चांगल्याप्रकारे उपयोग करा, शाश्वत गुंतवणूक करा, अनावश्यक बाबींवर खर्च करु नका, असेही ते म्हणाले. रकमेच्या गुंतवणुकीसाठी चांगल्या पर्यायांची माहिती खातेदारांना होण्यासाठी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापकांच्या माध्यमातून मार्गदर्शन शिबीर आयोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.यावेळी पुणे (पश्चिम) रिंगरोडसाठी हवेली तालुक्यातील कल्याण गावातील एकाच कुटुंबातील 9 शेतकरी, मावळ तालुक्यातील ऊर्से गावातील दोन शेतकरी, पाचाणे गावातील शेतजमिनीचा मोबदल्याचा धनादेश, मुळशी तालुक्यातील घोटावडे गावातील दोन शेतकरी असे एकूण सुमारे 3 हेक्टर 17 आर संपादित क्षेत्रासाठी 13 कोटी 82 लाख 90 हजार रुपयांचे धनादेश शेतकऱ्यांना देण्यात आले.

# ललित कला अकादमीसाठी 'साकडे'

## » आमदार महेश लांडगे यांचे जागा हस्तांतरासाठी मुख्यमंत्र्यांना निवेदन

### » पिंपरी-चिंचवडमधील 15 एकर जागेत साकारणार अकादमी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या ताब्यातील प्रस्तावित जागा राष्ट्रीय ललित कला अकादमीकडे हस्तांतरीत करावी आणि अकादमीच्या कामाला गती द्यावी, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**

याबाबत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, राष्ट्रीय ललित कलांचे संगोपन, प्रसार आणि संशोधन करणा-या केंद्र सरकारच्या राष्ट्रीय ललित कला अकादमीचे प्रादेशिक केंद्र पिंपरी-चिंचवडमध्ये स्थापन केले जाणार आहे. केंद्र सरकारने यासाठी मान्यता मिळाली असून, ही आम्हा पिंपरी-चिंचवडकरांसाठी निश्चितच अभिमानाची बाब आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील भोसरी एमआयडीसी जे- ब्लॉक मोकळी जागा क्रमांक




२९ येथील आरक्षण क्र. ४५ ही जागा बांधकामासह राष्ट्रीय ललित कला अकादमीस हस्तांतरित करण्यासाठी महापालिका प्रशासनाने एमआयडीसीच्या ताब्यात दिली आहे. सदर जागेची मूळ मालकी एमआयडीसीची असल्यामुळे एमआयडीसीच्या सदस्य मंडळ बैठकीत मा. उद्योग मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली ३९२ व्या बैठकीत ठराव क्र. ६३९७ अन्वये भूखंड बांधकामासह ललित कला अकादमीच्या प्रकल्पाकरिता करारनामा रुपये १/- दराने वाटप करण्यास मंजुरी दिली आहे.

राज्यातील कलावंताना प्रोत्साहन मिळावे, तसेच पारंपरिक कलांचे जतन व्हावे. या करिता राष्ट्रीय ललित कला केंद्र महाराष्ट्रात होण्यासाठी अनेक कलाकार प्रयत्नशील होते. त्यासाठी पिंपरी-चिंचवड येथील महापालिकेच्या आरक्षणाची जागा निश्चित केली आहे. सदर जागेचा ताबा 'एमआयडीसी'कडे देण्यात आला. त्या जागेचा ताबा आता राष्ट्रीय कला अकादमीकडे देण्यात यावा, अशी मागणीही आमदार लांडगे यांनी केली आहे.

### शहराच्या लौकीकात भर पडणार...

» प्रस्तावित, ललित कला अकादमीच्या केंद्रामुळे कलांच्या प्रदर्शनांसाठी कलादालन उपलब्ध होणार आहे. तसेच, संशोधनासाठी स्टुडिओ, लेझरसह नवतंत्रज्ञानावर आधारित कलांसाठी दालन, कलेचे शिक्षण घेणा-यांसाठी शिष्यवृत्ती आणि कार्यशाळांचे आयोजन, जेष्ठ कलाकारांच्या कलाकृतींचे संग्रहालय, कलाकारांसाठी निवासव्यवस्था आणि महाराष्ट्रातील कलांचा इतिहास सांगणारे प्रदर्शन व्यवस्था यामुळे उपलब्ध होणार आहे. या केंद्रामुळे कलांचा विकास होण्याबरोबरच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संधी निर्माण होता आहेत. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहराला सांस्कृतिक, अध्यात्मिक आणि ऐतिहासिक वारसा आहे. तसेच, नामांकीत शिक्षण संस्थां आहेत. त्यामुळे या ठिकाणी राष्ट्रीय ललित कला अकादमीचे प्रादेशिक केंद्र झाल्यास खऱ्या अर्थाने शहराच्या लौकीकात भर पडणार आहे.

---

# शहराध्यक्षपदी अजित गव्हाणे!

## » अजित पवार गट: राहूल भोसले, शाम लांडे, जगदीश शेट्टी, प्रशांत शितोळे, फजल शेख कार्याध्यक्ष

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) पिंपरी-चिंचवड शहराध्यक्षपदी ज्येष्ठ माजी नगरसेवक अजित गव्हाणे यांची निवड करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी बुधवारी (दि. 19) निवडीचे पत्र दिले. यावेळी राहूल भोसले, शाम लांडे, जगदीश शेट्टी, प्रशांत शितोळे, फजल शेख यांची कार्याध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे.**



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या संघटनात्मक निवडी सुरू केल्या आहेत. पिंपरी-चिंचवड शहर हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला समजला जातो. राष्ट्रवादीच्या बहुतांशी सर्वच आजी-माजी नगरसेवकांनी अजित गव्हाणे यांच्या नेतृत्त्वाखाली अजित पवार यांना पाठींबा जाहीर केला होता. त्यानंतर अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आज शहरातील प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या निवडी मुंबईत झालेल्या एका कार्यक्रमात जाहीर केल्या आहेत. यावेळी माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, माजी नगरसेवक पंकज भालेकर, राहूल भोसले, शाम लांडे, प्रभाकर वाघेरे, प्रसाद शेट्टी व इतर मान्यवर उपस्थित होते. अजित गव्हाणे यांच्याकडेच शहराध्यक्षपदाची धुरा सोपविल्याने राष्ट्रवादीला नव्याने उभारी घेण्यास तसेच पवार गटाची ताकद शहरात वाढविण्यास मोठी मदत होणार आहे.

> “ पिंपरी-चिंचवड शहर हे राष्ट्रवादीचा बालेकिल्ला समजले जाते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात राष्ट्रवादीची ताकद वाढविण्याबरोबरच राज्य शासनाच्या माध्यमातून शहर विकासाची अधिकाधिक कामे मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न असेल. पिंपरी-चिंचवडकरांचे प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही कटीबद्ध राहू.
>
> **-अजित दामोदर गव्हाणे,**
> **शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, पिंपरी-चिंचवड शहर (जिल्हा)**

---

# शहरात डेंगीचे रुग्णांमध्ये वाढ


। पिंपरी ।महाईन्यूज ।

शहरात डेंगीच्या रुग्णसंख्येत सातत्याने वाढ होत आहे. या महिन्यात आतापर्यंत डेंगीचे १८ रुग्ण आढळून आले आहेत. बुधवारी एका दिवसात शहरातील पाच जणांना डेंगीचा संसर्ग झाल्याचे निदान झाले. पावसाला सुरुवात झाल्यापासून शहरात डेंगीचे रुग्ण वाढत आहेत. संशयित रुग्णांच्या संख्येतही जूनच्या तुलनेत जुलैमध्ये दुपटीने वाढ झाली आहे. जून महिन्यात डेंगीचे निदान झालेला एकही रुग्ण शहरात आढळला नव्हता. संशयित रुग्णसंख्या चारशे बहात्तर एवढी होती. हीच संख्या जुलै महिन्यात आतापर्यंत नऊशे सेहेचाळीस झाली आहे. डेंगीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पालिका प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली असून, डासोत्पती करण्यास कारणीभूत ठरलेल्या पाचशे आठ जणांना आतापर्यंत नोटीस बजाविण्यात आली आहे. दोन लाखांचा दंड वसूल शहरात डेंगीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिका प्रशासनाने केलेल्या प्रतिबंधात्मक कारवाईमध्ये जून व जुलैमध्ये तब्बल दोन लाख तीन हजारांचा दंड वसूल केला आहे. यात जुलैमध्ये आतापर्यंत ४९ जणांकडून एक लाख ४६ हजारांचा दंड वसूल करण्यात आला आहे. या वर्षी पावसाला सुरुवात झाल्यानंतर महापालिकेच्या आठ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये डास उत्पत्ती होणाऱ्या ठिकाणांचा शोध घेण्यासाठी पथके नेमण्यात आली होती. नागरिकांनी आपल्या घराच्या परिसरात डासांच्या अळ्या निर्माण होणार नाहीत, याची काळजी घेण्याबाबत आरोग्य विभागाने याआधीच सूचना दिल्या होत्या. या पथकांद्वारे घरांबरोबरच खासगी कार्यालये, बांधकाम आस्थापने या ठिकाणीही पथकांची तपासणी मोहीम सुरु असल्याचे आरोग्य विभागाच्या वतीने सांगण्यात आले आहे. “कीटकजन्य रोगाचा उद्रेक होऊ नये, यासाठी महापालिकेची कारवाई सुरू असून, डासोत्पती होणाऱ्या ठिकाणांना नोटीस बजाविण्यात येत आहे. शहरातील आठ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये तपासणीसाठी नियुक्त केलेल्या पथकांमध्ये मनुष्यबळ वाढविण्यात आले आहे.

# भारत-फ्रान्स मैत्री पर्व



भूमिका



**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा प्रत्येक परदेश दौरा भारतासाठी एकेक नवे शिखर पादाक्रांत करणारा ठरत असतो. जगाच्या पातळीवर भारताची प्रतिष्ठा वाढविण्याबरोबरच अनेक नवे ऐतिहासिक करार या दौर्यांतून होत असतात आणि त्या माध्यमातून देश प्रगतीचे पाऊल पुढे टाकत असतो. पंतप्रधानांचा अलीकडेच झालेला अमेरिकेचा दौरा त्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरला होता.**

रशिया-युक्रेन युद्धामध्ये भारताने तटस्थतेची भूमिका घेतल्यामुळे अमेरिका नाराज असल्याचे मानले जात होते. परंतु मोदी यांच्या दौर्याने तो समज खोटा ठरवला. पाठोपाठ झालेला त्यांचा फ्रान्सचा दौराही अनेक अर्थांनी महत्त्वपूर्ण ठरला. जगाच्या पाठीवर कुणाच्याही मागे फरफटत न जाता स्वतःची धोरणे आपल्या अटी-शर्तींवर ठरवणारे देश म्हणून भारत आणि फ्रान्सचीही ओळख आहे. अशा या देशाच्या दौर्यामध्ये मोदींनी संरक्षण क्षेत्रात सहकार्य वाढविण्याबरोबरच आगामी पंचवीस वर्षांसाठी भारत-फ्रान्स संबंधांचा दिशादर्शक आराखडाच तयार केला. फ्रान्स सरकारकडून ङ्ग्रँड क्रॉस ऑफ द लीजन ऑफ ऑनरफ या फ्रान्सच्या सर्वोच्च सन्मानाने पंतप्रधान मोदी यांचा गौरव करण्यात आला. हा सन्मान मिळवणारे मोदी हे भारताचे पहिले पंतप्रधान आहेत. या सन्मानाइतक्याच आणखी एका महत्त्वाच्या ाबीचा उल्लेख करावयास हवा, तो म्हणजे ङ्बॅस्टिल डे परेडफमध्ये मोदी यांचा सहभाग. त्यांनी जागतिक पातळीवर मिळवलेल्या प्रतिष्ठेची कल्पना यावरून येऊ शकते. भारत आणि फ्रान्स या दोन्ही देशांच्या मैत्रीला अनेक कंगोरे आहेत. जागतिक परिप्रेक्ष्यात त्याकडे अनेक अंगांनी पाहता येऊ शकते. दोन्ही देशांचे भौगोलिक स्थान वेगळे. दोन्ही देश वेगवेगळ्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीतले असून त्यांचे आर्थिक विकासाचे टप्पे वेगवेगळे असे असले तरीसुद्धा जागतिक प्रश्नांकडे पाहण्यासंदर्भातील त्यांच्या दृष्टीमध्ये असलेले साम्य त्यांची मैत्री अधिक घट्ट करणारे आहे. दोन्ही देशांचे आंतरराष्ट्रीय घडामोडींबद्दलचे विचार मिळते-जुळते आहेत.

मागील २५ वर्षांत भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये मोठी स्थित्यंतरे झाली असून आर्थिक क्षेत्रात भारताने मोठी प्रगती केली. आर्थिक आणि भू-राजकीय संदर्भ वेगाने दलल्यामुळे भारत-फ्रान्स यांना एकत्र येऊन काम करण्यासाठी पोषक वातावरण बनले. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांच्यासह अनेक युरोपीय राष्ट्रांच्या नेत्यांच्या दृष्टीने चीन हा त्यांचा सर्वांत मोठा आर्थिक पातळीवरील प्रतिस्पर्धी. असे असले तरीसुद्धा चीनपासून घाईगडबडीने फारकत घेणे शक्य नसल्याने बहुतेक देशांनी चीनशी असलेले आर्थिक संध कमी कमी करीत नेले आहेत. अशा परिस्थितीत भारत आणि फ्रान्स यांना एकत्रित काम करण्यासाठी नव्या संधी उपलब्ध होऊ शकतात आणि दोन्ही देशांना त्याचा दीर्घकालीन फायदा होऊ शकतो. मोदी यांच्या फ्रान्सच्या भेटीमध्ये त्यादृष्टीने अनेक महत्त्वाच्या घडामोडी घडल्या.

उभय देशातील संबंधांना मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी असली तरी स्वातंत्र्योत्तर काळात ते ज्या रीतीने पुढे जायला हवे होते, तसे ते गेले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. फ्रान्सचे माजी राष्ट्राध्यक्ष जॅक शिराक यांनी भारताशी मैत्रीचा हात पुढे केला आणि तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला. दोन्ही देशांनी धोरणसिद्ध भागीदार बनण्याचा करार केला. वाजपेयी यांच्या काळात झालेल्या या कराराला पंचवीस वर्षे झाली आहेत आणि मोदींच्या दौर्याला असलेली त्या कराराच्या रौप्यमहोत्सवाची पार्श्वभूमीही लक्षात घ्यावी लागते. पंचवीस वर्षांपासून दोन्ही देश सर्वच बहुपक्षीय मंच आणि संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत एकत्र काम करीत आहेत.

आंतरराष्ट्रीय दहशतवाद, हवामान बदल, शाश्वत विकास इत्यादी मुद्द्यांवर दोन्ही देशांच्या मतांमध्ये समानता दिसून येते.

## संपादकीय »

### अजेयाचा पराजय!

***आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या स्पर्धेवरही पाणी सोडणारे अतिरेकी धर्मप्रेम, उन्मादी देहबोली आणि रग- यांपुढे क्षमता व गुणही फिके ठरायला हवेत असे कित्येकांना वाटू लागले असणार..***

बँका वा वित्तसंस्थांबाबत इंग्रजीत ‘टू बिग टु फेल’ अशा अर्थाचा वाक्प्रचार आहे. याचा अर्थ असा की काही काही संस्था इतक्या मोठय़ा होतात की त्यांचे अपयशी होणे परवडणारे नसते. काही व्यक्तींबाबतही हे लागू होते. व्यक्तींबाबत तर हे सत्य अधिक. याचा अर्थ असा अजिबात नाही की अशा व्यक्तींच्या गुणांची काही क्षती झालेली असते वा दुर्गुणांनी उचल खाल्लेली असते. या व्यक्ती गुणवान असतातच. तथापि बराच काळ पराभवाची कटू चव चाखावी न लागल्याने या व्यक्ती अजेय आहेत असे त्यांच्या प्रतिस्पर्ध्यास वाटू लागते आणि कालौघात ही व्यक्तीदेखील अजेय असल्यासारखी वागू लागते. ही त्या व्यक्तीइतकीच, किंबहुना त्यापेक्षा अधिक त्या व्यवस्थेसाठी धोक्याची घंटा. टेनिस या रम्य राजस खेळाबाबत ती वाजू लागलेली होती. कोणतीही महत्त्वाची स्पर्धा असो.

**रुढ अर्थानं औपचारिक शिक्षण न झालेल्या, उपेक्षित समाजात जन्मलेल्या माणसाचं साहित्य विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात लागतं, त्यांच्या शब्दांनी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ घराघरात पोहचते, त्यांच्या साहित्याचा जगभर गौरव होतो, रशियासारख्या देशात त्यांचा पुतळा उभा राहतो, असे अण्णा भाऊ साठे आज काहीसे विस्मृतीत गेले आहेत. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचं काम पुन्हा एकदा समजून घ्यायला हवं.**

## अण्णा भाऊ साठे समजून घ्यायला हवेत!

वास्तविक, प्रत्येक मनुष्याची प्रतिभा विकसित व्हायला समान संधी मिळायला हवी. संयुक्त राष्ट्रांसारख्या जागतिक संघटनेनं तसेच आपल्या देशाच्या संविधानानं ते ठळकपणे नमूद केलं आहे. मात्र आर्थिक स्थिती आणि विशेषकरुन जातिव्यवस्था हे घडू देत नाही. भारतीय उपखंडाला विषमतेवर आधारलेल्या जातिव्यवस्थेनं जराजर्जर केलं. आपले कायदे, योजना यांनी आज तुलनेनं फरक पडला असला तरी त्यातून आपली पूर्ण सुटका अजून झालेली नाही.

जोवर लग्न करताना माणसं जातीतच स्थळ शोधतात तोवर जात गेली असं म्हणता येणार नाही. माणसांना जखडून टाकणाऱ्या जातींच्या या उतरंडीत अगदी तळाला असलेल्या, एकेकाळी अस्पृश्य गणल्या गेलेल्या मातंग समाजात अण्णा भाऊ जन्माला आले. आयुष्यभर जातीचं आणि त्यातून आलेल्या वेदनेची जखम अंगावर मिरवतच अण्णांनी आपल्या शब्दांना वैश्विकतेची धार दिली. आज ते शब्द




पीएचडीवाली पोरं अभ्यासताहेत. अण्णा भाऊंच्या जन्माच्या जवळपास पाऊण शतक आधी महात्मा फुले-सावित्रीबाई फुलेंनी सुरु केलेल्या मुलींच्या शाळेत शिकलेली मुक्ता साळवे मातंग समाजातली. मुक्ताचा ‘ज्ञानोदय’ मासिकामध्ये १ मार्च १८५५ ला "मांगमहारांच्या दुःखाविषयी निबंध" या शीर्षकाखाली एक लेख प्रसिद्ध झाला होता.

या लेखात अस्पृश्यांना वेद, धर्मग्रंथ वाचायला मनाई करणाऱ्या धर्माच्या ठेकेदारांना ती ठणकावते– “याचा अर्थ आम्हास धर्म-पुस्तक नाही. मग आम्ही धर्मरहित आहोत का? तर हे भगवान, आम्हाला आमचा धर्म कोणता ते सांग!” या निबंधात मुक्तानं तत्कालीन अस्पृश्य मानल्या गेलेल्या समूहांच्या दयनीय अवस्थेवर प्रकाश टाकून त्यांना अन्यायाच्या विरोधात उभं राहण्याचं आवाहन केलं आहे. मुक्ताच्या आणि पुढं डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक प्रेरणेचे, लढ्याचे वारसदार अण्णा भाऊ आहेत. त्यांच्या जन्माच्या वेळी मुक्तानं वर्णन केलेली अवस्था फारशी बदललेली नव्हती. इंग्रजी राजवटीच्या काळात शहरात काही प्रमाणात उद्योगधंदे उभे राहत होते. त्यामुळे गावाकडं रोजगाराविना उपासमार होणारे आणि जातीचा जाच सोसणारे समुदाय मुंबईची वाट धरु लागले. अण्णा भाऊंचे वडील आधीच मुंबईला आले होते. त्यांच्या मागोमाग अण्णा भाऊंसह त्यांचं सर्व कुटुंब मुंबईला आलं. कसं? तर चालत. प्रवासासाठी पैसे नाहीत. म्हणून मजल दरमजल करत, मध्ये लागलेल्या शहरांत काही काम करुन अन्न मिळवत ते मुंबई नगरीत पोहोचले.

## ।। अभंगवाणी ।।



गरुडाचें वारिकें कासे पीतांबर ।
सांवळें मनोहर कैं देखेन ॥१॥

बरवया बरवंटा घनमेघ सांवळा ।
वैजयंतीमाळा गळां शोभे ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मुंबईत पावसाचा हाहाकार!

## » लोकल सेवा विस्कळीत, चाकरमान्यांचे हाल; मध्य रेल्वे डोंबिवलीपर्यंतच

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकल सेवा विस्कळीत, चाकरमान्यांचे हाल; मध्य रेल्वेची सेवा डोंबिवलीपर्यंतच मुंबई शहर व उपनगरांत सकाळपासून सुरू असणाऱ्या मुसळधार पावसामुळे चाकरमान्यांची पुरती तारांबळ उडाली आहे. मुंबईची लाईफलाइन समजली जाणारी लोकल सेवा रुळांवर पाणी साचल्यामुळे विस्कळीत झाली आहे.**



याचा सर्वाधिक फटका मध्य रेल्वेला बसला आहे. ट्रॅकवर पाणी साचल्यामुळे मध्य रेल्वेची वाहतूक डोंबिवली ते कसारा-कर्जतपर्यंत पूर्णतः ठप्प झाली आहे. सध्या CSMT ते डोंबिवली दरम्यान लोकल सेवा सुरू आहे. यामुळे मुंबई भागातील सर्वच स्थानकांवर चाकरमान्यांची तुडुंब गर्दी दिसून येत आहे. लोकल सेवा विस्कळीत झाल्याची घोषणा भायखळा रेल्वे स्थानकात केली जात आहे. लांब पल्ल्याच्या गाड्यांनाही पावसाचा फटका बसला आहे. कोल्हापूर-सीएसएमटी गाडी पुण्यात थांबवण्यात आली आहे. तसेच पुणे-सीएसएमटी इंटरसिटी एक्स्प्रेस, पुणे-सीएसएमटी डेक्कन एक्स्प्रेस, पुणे-सीएसएमटी इंद्रायणी एक्स्प्रेस रद्द करण्यात आली आहे.

सीएसएमटीहून पुण्याकडे जाणारी सिंहगड एक्स्प्रेसही तूर्त रद्द करण्यात आली आहे. हवामान खात्याने गुरुवारीही मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. त्यामुळे उद्या पुणे-सीएसएमटी एक्स्प्रेस व सीएसएमटी-पुणे सिंहगड एक्स्प्रेस रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय सीएसएमटी-पुणे इंटरसिटी एक्स्प्रेस, सीएसएमटी-पुणे डेक्कन आणि सीएसएमटी-पुणे इंद्रायणी एक्स्प्रेस या गाड्याही उद्या धावणार नाहीत. मध्य रेल्वेने ही माहिती दिली आहे.

### मुख्यमंत्र्यांनी स्थितीचा घेतला आढावा

» मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील पाऊस व पूरस्थितीचा आढावा घेतला. ते म्हणाले की, मी सकाळपासून विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व मुख्य सचिवांच्या संपर्कात आहे. या सर्वांना योग्य त्या सूचना केल्या आहेत. पाऊस जोरात असल्यामुळे एसडीआरएफ, एनडीआरएफ, जिल्हा आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणा आदी सर्वच यंत्रणा अलर्टवर आहेत. गरज असेल तिथे जनतेला सुरक्षित स्थळी हलवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कोणत्याही स्थितीत नागरिकांची गैरसोय व जिवितहाणी होणार नाही याची काळजी घेतली जात आहे.

### शाळा, महाविद्यालये बंद

» राज्यात पूरस्थिती उद्भवलेल्या जिल्ह्यांत मदत यंत्रणा तैनात करण्यात आली आहे. खबरदारी म्हणून शाळा व महाविद्यालयेही बंद ठेवण्यात आली आहेत. मंत्रालयातील कर्मचाऱ्यांनाही लवकर सोडण्यात आले आहे, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

# अजित पवार-उद्धव ठाकरे भेट

## » जनतेला योग्य न्याय मिळेल : ठाकरे

। मुंबई । प्रतिनिधी। महाईन्यूज

**बंगरुळूत देशप्रेमी पक्षाची एक बैठक झाली. आमची लढाई ही कुणा एका व्यक्तीविरोधात किंवा पक्षाविरोधात नसून आमची लढाईही हुकुमशाहीविरोधात आहे. कारण पक्ष येत असतात, येत असतात, जात असतात, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केले आहे. तर पंतप्रधान, मुख्यमंत्री ही पदे येतात आणि जातात असेही त्यांनी म्हटले आहे.**

दरम्यान उद्धव ठाकरे पुढे बओलताना म्हणाले की, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हातात राज्याच्या आर्थिक चाव्या आल्या आहेत. त्यांच्या कामाची पद्धत माहिती असल्याने जनतेना योग्य न्याय मिळेल असेही त्यांनी यावेळी म्हटले आहे. उद्धव ठाकरे म्हणाले की, अजित पवारांनी राज्यासाठी चांगले काम करावे, कारण सत्तेसाठी साठमारी सध्या राज्यात सुरू आहे. राज्यातील प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न असो असे सर्व विषयावर मी अजित पवार यांच्याशी चर्चा केली. अजित पवारांनी अडीच वर्षे माझ्यासोबत काम केले असून त्यांचा स्वभाग आणि काम करण्याची पद्धत मला माहिती असल्याने मी खात्रीने सांगतो ते जनतेसाठी काम करतील. कारण राज्याच्या तिजारीच्या चाव्या त्यांना देण्यात आल्या आहेत.



### असे व्हिडिओ बघत नाही

» उद्धव ठाकरे म्हणाले की, किरीट सोमय्या व्हायरल व्हिडिओ प्रकरणी राज्यभरातील महिलांनी आपली संतप्त भूमिका मांडली आहे. त्यामुळे आता सरकारने कारवाई करावी. तसेच, उद्धव ठाकरे यांनी आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांचीही भेट घेतली. या भेटीबद्दल उद्धव ठाकरे म्हणाले, अजित पवार व आम्ही पूर्वी एकत्र काम केले आहे. त्यांच्याकडे पुन्हा आता तिजोरीच्या चाव्या गेल्या आहेत. ते जनतेला मदत करतील अशी अपेक्षा आहे. विरोधी गोटात असूनही अजितदादांबद्दल उद्धव ठाकरे यांनी काढलेल्या या वक्तव्याचे आता राजकीय अर्थ काढले जात आहेत.

# शेतकरी प्रश्नांवर सरकार गंभीर नाही

। मुंबई । प्रतिनिधी। महाईन्यूज

राज्यातील भाजपाप्रणित ट्रिपल इंजिन सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर गंभीर नाही. सरकार कर्ज वाटप व बियाणांसंदर्भात चुकीची माहिती देत आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने निर्देश जारी केल्याने अनेक सहकारी बँकांनी कर्ज वाटपच केले नाही, राष्ट्रीयकृत बँका तर शेतकऱ्यांना दारातही उभे करत नाहीत आणि सरकार सांगते कर्जवाटप झाले.

सरकार चुकीचे उत्तर देत असून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा हा प्रकार आहे, असा संताप प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केला. विधानसभेतील चर्चेत भाग घेत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सरकार तोफ डागली. ते पुढे म्हणाले की, बियाणे व खतांच्या किंमती वाढल्याने शेतकरी संकटात आहे का? बँका कर्ज देत नसल्याने शेतकऱ्यांना सावकाराकडे जावे लागते का? असे प्रश्न विचारण्यात आले असता, हे खरे नाही, असे धादांत खोटे व चुकीचे उत्तर सरकारकडून देण्यात आले आहे. अनेक सहकारी बँकांनी शेतकऱ्यांना कर्ज वाटप केलेले नाही. बियाणे खतांच्या किमती वाढलेल्या आहेत, बोगस बियाणांचा सुळसुळाट आहे. मंत्र्यांच्या नावाने धाडी टाकून व्यापाऱ्याकडून वसुली करण्यात आली, त्यावर सरकारने काय कारवाई केली, असे प्रश्न पटोले यांनी उपस्थित केले.

# तीस्ता सेटलवाड यांना जामीन

## » साक्षीदारांवर प्रभाव टाकू नये सर्वोच्च न्यायालयाने दिले आदेश

।नवी दिल्ली।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**सामाजिक कार्यकर्त्या तीस्ता सेटलवाड यांना सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी नियमित जामीन मंजूर केला. तसेच, त्यांना गोध्रा नंतरच्या दंगलीतील साक्षीदारांवर प्रभाव टाकू नये असे आदेश दिले आहेत. न्यायमूर्ती बीआर गवई, न्यायमूर्ती एएस बोपण्णा आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठाने गुजरात उच्च न्यायालयाचा 1 जुलैचा आदेशही बाजूला ठेवला, त्यामध्ये तिस्ता यांना 1 जुलैला आत्मसमर्पण करण्यास सांगण्यात आले होते. न्यायालयाने म्हटले की, या प्रकरणी तिस्ताविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.**


त्यामुळे कोठडीत चौकशी करण्याची गरज नाही. तीस्ता सेटलवाड यांच्यावर 2002 च्या गुजरात दंगलीशी संबंधित खटल्यांमध्ये निरपराध लोकांना अडकवण्यासाठी पुरावे तयार केल्याचा आरोप आहे. न्यायालयात आत्मसमर्पण केलेला तिस्ता यांचा पासपोर्ट सत्र न्यायालयातच जमा केला जाणार आहे.

साक्षीदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न झाल्यास त्यांनी थेट सर्वोच्च न्यायालयात जावे, असे न्यायालयाने गुजरात पोलिसांना सांगितले आहे. सेटलवाड यांना गेल्या वर्षी 25 जून रोजी अटक करण्यात आली होती. सात दिवस पोलीस कोठडीत ठेवण्यात आल्यानंतर 2 जुलै रोजी त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली. 24 जून 2022 रोजी सर्वोच्च न्यायालयाने 2002 च्या गुजरात दंगलीप्रकरणी तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांना क्लीन चिट देणाऱ्या एसआयटीच्या अहवालाविरोधातील याचिका फेटाळून लावली.

झाकिया जाफरी यांनी ही याचिका दाखल केली आहे. या दंगलींमध्ये झाकिया जाफरी यांचे पती एहसान जाफरी मारले गेले. झाकियाच्या याचिकेत योग्यता नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले.

खटल्यातील सहकारी याचिकाकर्त्या तिस्ता झाकिया जाफरी यांच्या भावनांशी खेळल्याचेही न्यायालयाने म्हटले होते. न्यायालयाने तिस्ता यांच्या भूमिकेची चौकशी करण्यास सांगितले होते. यानंतर तिस्ता यांना मुंबईतून अटक करण्यात आली. अहमदाबाद सत्र न्यायालयाने 30 जुलै रोजी तिस्ताचा जामीन अर्ज फेटाळला होता. यानंतर त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. 3 ऑगस्ट रोजी उच्च न्यायालयाने याप्रकरणी राज्य सरकारला नोटीस बजावली आणि 19 सप्टेंबर ही सुनावणीची तारीख निश्चित केली.

हायकोर्टाने त्यांचा युक्तिवाद ग्राह्य धरला नाही तेव्हा तिस्ता यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. 2 सप्टेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने त्यांना अंतरिम जामीन मंजूर केला. उच्च न्यायालय जामिनावर निर्णय देत नाही तोपर्यंत पासपोर्ट सत्र न्यायालयात जमा करावा, असे न्यायालयाने म्हटले. 1 जुलै रोजी उच्च न्यायालयाने त्यांना तत्काळ आत्मसमर्पण करण्याचे आदेश दिले होते.




### गुजरातमध्ये 2002 मध्ये जातीय हिंसाचार

**गुजरात दंगलीप्रकरणी अहमदाबाद क्राइम ब्रँचने तीस्ता सेटलवाड, माजी आयपीएस संजीव भट्ट आणि डीजीपी आरबी श्रीकुमार यांच्याविरुद्ध बनावट कागदपत्रांद्वारे कट रचल्याचा गुन्हा दाखल केला होता. 27 फेब्रुवारी 2002 रोजी गुजरातमधील गोध्रा स्टेशनवर साबरमती एक्स्प्रेस ट्रेनच्या S-6 डब्याला आग लागली. या आगीत 59 जणांचा मृत्यू झाला होता. हे सर्व कारसेवक होते, ते अयोध्येहून परतत होते. गोध्रा घटनेनंतर संपूर्ण गुजरातमध्ये दंगली उसळल्या. या दंगलींमध्ये 1,044 लोक मारले गेले. त्यावेळी नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री होते.**

---

# पावसाळी अधिवेशन आज

## » मणिपूर हिंसाचारावर चर्चेस सरकार तयार

।नवी दिल्ली।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**संसदेचे पावसाळी अधिवेशन गुरुवारी म्हणजे 20 जुलैला सुरू होत आहे. त्याच्या एक दिवस आधी केंद्र सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली. जुन्या संसदेच्या वाचनालयात झालेल्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह होते. विरोधकांच्या मागणीवरून केंद्र सरकारने अधिवेशनादरम्यान मणिपूर हिंसाचारावर चर्चा करण्याचे मान्य केले.**

तत्पूर्वी सकाळी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी व्यवसाय सल्लागार समितीची बैठक घेतली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी म्हणाले की, सरकार प्रत्येक मुद्द्यावर नियमानुसार आणि सभापतींच्या परवानगीनंतर चर्चा करण्यास तयार आहे. जोशी म्हणाले, अधिवेशनासाठी 32 मुद्दे आहेत. काँग्रेसचे मीडिया प्रभारी जयराम रमेश म्हणाले - मोदी सरकारने मणिपूर हिंसाचार आणि महागाईवर संसदेत चर्चा करावी. सरकारला जुनी वृत्ती बदलावी लागेल. आत्तापर्यंत ते 'माझे ऐका, नसता चालते व्हा' अशी भूमिका घेत आले आहेत, असेही रमेश म्हणाले.



### कोणत्या मुद्द्यांवर होणार चर्चा

काँग्रेस खासदार जयराम रमेश म्हणाले की, आम्हाला मणिपूरच्या मुद्द्यावर चर्चा करायची आहे. राज्यपाल आणि नायब राज्यपालांच्या माध्यमातून लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या राज्य सरकारांवर होणाऱ्या हल्ल्यांवरही चर्चा होणार आहे. महागाई आणि अदानी प्रकरणातील संयुक्त संसदीय समितीवरही चर्चा होणार आहे. दिल्ली अध्यादेश, वन संरक्षण कायदा दुरुस्ती विधेयक आणि जैविक विविधता कायदा दुरुस्ती विधेयकाला संसदेत विरोध करणार असल्याचे जयराम रमेश म्हणाले.

### 11 ऑगस्टपर्यंत चालणार, 17 बैठका

संसदेचे पावसाळी अधिवेशन 11 ऑगस्टपर्यंत चालणार आहे. दोन्ही सभागृहांच्या एकूण 17 बैठका प्रस्तावित आहेत.

सरकारी सूत्रांच्या मते, अधिवेशनात अनेक महत्त्वाची विधेयके मांडली जाणार आहेत. सर्व पक्षांनी अधिवेशन चालवण्यासाठी सहकार्य करावे, कारण नियम आणि प्रक्रियेनुसार कोणत्याही विषयावर चर्चा करण्यास सरकार मागे हटत नाही, असेही म्हटले आहे. लोकसभा सचिवालयाच्या बुलेटिननुसार, अधिवेशनात दिल्ली अध्यादेशासह 21 नवीन विधेयके मांडली जाऊ शकतात. राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी यापूर्वी 18 जुलै रोजी सर्वपक्षीय बैठक बोलावली होती, परंतु एनडीए आणि विरोधी पक्षांच्या बैठकीमुळे ती स्थगित करावी लागली.

---

# हसिना विरोधात लोक रस्त्यावर

।नवी दिल्ली।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**



**बांगलादेशची राजधानी ढाका येथे पंतप्रधान शेख हसिना यांच्या विरोधात बुधवारी हजारो लोक रस्त्यावर उतरले. अल जझीराच्या वृत्तानुसार, लोकांनी ढाकामध्ये 13 किलोमीटर लांब मोर्चा काढला. याठिकाणी विरोधकांनी पुकारलेल्या रॅलीत हे लोक पोहोचले.**


हसिना यांच्या राजीनाम्याची मागणी यावेळी करण्यात आली. ढाकासह 16 ठिकाणी मोर्चे काढण्यात आले. त्यावेळी झालेल्या हिंसाचारात विरोधी पक्षाचा एक कार्यकर्ता ठार झाला, तर शेकडो लोक जखमी झाले. स्थानिक मीडियानुसार, बांगलादेशचा प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीने (बीएनपी) पुन्हा निवडणुकांच्या मागणीसाठी रॅलींचे आयोजन केले होते.

बांगलादेशातील विरोधी पक्ष अनेक दिवसांपासून सत्ताधारी पक्षावर (बांगलादेश अवामी लीग) भ्रष्टाचार आणि मानवाधिकारांचे उल्लंघन केल्याचा आरोप करत आहेत. अल जझीराने वृत्तसंस्था एएफपीच्या हवाल्याने म्हटले आहे की, ढाकासह 16 ठिकाणी रॅलीत हिंसाचार झाला. दरम्यान, बीएनपीचे प्रवक्ते जहीर उद्दीन स्वपन यांनी, सत्ताधारी पक्षाच्या विद्यार्थी संघटनेच्या एका कार्यकर्त्याने आमच्या पक्षाच्या साजिब हुसैन यांच्यावर गोळ्या झाडल्याने त्यांचा मृत्यू झाला, असा आरोप केला आहे.

### बांगलादेशात 2024 मध्ये निवडणुका

बांगलादेशमध्ये जानेवारी 2024 मध्ये सार्वत्रिक निवडणूक होणार

# ' चोरटं बॉलीवूड'!



बॉलीवूडच्या दिवंगत अभिनेत्री मीना कुमारी यांच्या आयुष्यावर आधारित बायोपिकची निर्मिती करण्यात येणार आहे असे कळताच चाहत्यांना कमालीचा आनंद झाला होता. ज्या अभिनेत्रीनं गेल्या तीन दशकांहून अधिक काळ प्रेक्षकांचे मनोरंजन केले त्या मीनाकुमारी यांचा चाहतावर्ग केवळ भारतातच नाहीतर जगभरामध्ये आहे. काही दिवसांपूर्वी बॉलीवूडमधून एक बातमी समोर आली होती. ती म्हणजे बॉलीवूडचा प्रसिद्ध डिझायनर मनीष मल्होत्रा हा आता दिग्दर्शक म्हणून डेब्यू करणार आहे. आणि तो मीना कुमारी यांच्यावर आधारित बायोपिकची निर्मिती करणार आहे. त्यात प्रसिद्ध अभिनेत्री क्रिती सेनॉन ही मीना कुमारी यांची भूमिका करणार असल्याची चर्चाही समोर आली आहे. अशातच हा चित्रपट वादाचे कारण ठरतो आहे.मीना कुमारी यांचा बायोपिक हा कायद्याच्या कचाट्यात सापडणार असल्याची चिन्हं दिसू लागली आहेत. मीना कुमारी यांचा सावत्र मुलगा ताजदार अमरोही यांनी या चित्रपटावर आक्षेप घेतला आहे. त्यांनी बॉलीवूडला चोरटं असं संबोधलं असून जे कुणी मीनाकुमारी यांच्या आयुष्यावर चित्रपटाची निर्मिती करत आहेत त्यांना आपण कायदेशीर मार्गानं धडा शिकवणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. ताजदार अमरोही हे कमाल अमरोही यांचे चिरंजीव आहेत. मीडियाशी बोलताना ताजदार हे नाराज असल्याचे दिसून आले आहे. त्यांनी म्हटले की, बॉलीवूडमधील काही लोकं ही दिवाळखोर आणि चोरटी आहेत. त्या लोकांना आमच्या आयुष्यात डोकावण्याचा काही एक अधिकार नाही. त्यांनी आमच्यापासून लांब राहावे. याचे परिणाम चांगले होणार नाही. त्यांनी वेळीच न ऐकल्यास आम्ही कायदेशीर मार्गाचा अवलंब करणार असल्याचे ताजदार यांनी म्हटले आहे. मेकर्सनं कोणताही परवानगी न घेता मीना कुमारी यांच्या आयुष्यावर चित्रपट तयार करणार असल्याची घोषणा केली.

# गिगी हदीदला गांजासह अटक

सुपरमॉडेल गिगी हदीद काही दिवसांपूर्वी केमन बेटांवर सुट्टी घालवण्यासाठी गेली होती. त्याठिकाणी 10 जुलै रोजी गांजा बाळगल्याच्या आरोपावरून तिला विमानतळावर अटक करण्यात आली. सध्या गिगी जामिनावर बाहेर आहे. मॉडेलने नुकतेच तिच्या सोशल मीडिया अकाऊंटवर केमन आयलंड ट्रिपचे काही फोटो शेअर केले आहेत. हे शेअर करत गिगीने , 'ऑल इज वेल दॅट एंड्स वेल' असे लिहिले.मीडिया रिपोर्ट्सनुसार, जेव्हा गिगीला अटक करण्यात आली तेव्हा ती मैत्रिण लेह निकोलसोबत प्रवास करत होती. विमानतळावरील सामानाचे स्कॅनिंग करताना कस्टम अधिकाऱ्यांनी तिला पकडले. अधिकाऱ्यांना तिच्या सामानात गांजा आणि साहित्य सापडले.गिगीला तिथून प्रिझनर्स डिटेन्शन सेंटरमध्ये पाठवण्यात आले. नंतर दोन दिवसांनी 12 जुलै रोजी न्यायालयात हजर करण्यात आले. गिगी आणि तिच्या मैत्रिणीने चूक मान्य केली. 1,000 डॉलर दंड भरल्यानंतर दोघींची जामिनावर सुटका करण्यात आली.मॉडेलने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर या व्हेकेशनचे काही फोटो शेअर केले आहेत. ही पोस्ट शेअर करत लिहिले, 'ऑल इज वेल दॅट एंड्स वेल.' फोटोंमध्ये ती मैत्रिणींसोबत बीचवर एन्जॉय करताना दिसत आहे.गिगी या वर्षी एप्रिलमध्ये भारतात आली होती. नीता मुकेश अंबानी कल्चरल सेंटरच्या कार्यक्रमात तिने सहभाग घेतला होता. गिगी व्यतिरिक्त, टॉम हॉलंड, झेंडाया आणि पेनेलोप क्रूझ यांसारखे हॉलिवूड स्टार्स देखील या कार्यक्रमात उपस्थित होते.गिगी हदीद हॉलिवूड अभिनेता लिओनार्डो डिकॅप्रियोला डेट करत असल्याची चर्चा आहे. मात्र, सध्या तरी दोघांचा सेटल होण्याचा कोणताही विचार नसल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

गिगी हदीद एक अमेरिकन सुपरमॉडेल आणि टेलिव्हिजन सेलिब्रिटी आहे. वयाच्या दुसऱ्या वर्षापासून तिने मॉडेलिंगला सुरुवात केली होती.



# 'तुला सणकन ठेवूनच देणार

टीव्ही मनोरंजन विश्वात ज्या रियॅलिटी शो चा कायमच बोलबाला राहिला आहे त्या बिग बॉस ओटीटीच्या दुसऱ्या पर्वानं प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. त्यात सहभागी झालेले स्पर्धक, त्यांचे वाद हे प्रेक्षकांसाठी खास चर्चेचा विषय राहिला आहे. सुरुवातीच्या काळात प्रसिद्ध अभिनेत्री पूजा भट्ट आणि नवाझुद्दीन सिद्धिकीची पत्नी आलिया यांच्यातील वाद समोर आला होता. सध्या पुन्हा एकदा पूजा भट्ट ही चर्चेत आली आहे. बिग बॉसच्या घरातील सदस्यांवर आगपाखड करत पूजानं आपल्या वाटेला गेल्यास काय परिणाम होतील याची जाणीव करुन दिली आहे.त्यामुळे पूजा सोशल मीडियावर जोरदार ट्रेंड करते आहे. आलिया सिद्धिकीनं सुरुवातीला तिच्या वैयक्तिक आयुष्यातील गोष्टी समोर आणून त्याविषयी चर्चा सुरु केली होती. त्यावरुन पूजानं तिला फटकारले होते. आलिया तू दरवेळी तुझ्या वैवाहिक आयुष्यात काय झाले यावरुन प्रेक्षकांना गृहीत धरु नकोस. त से च त्यांची सहानुभूती मिळवण्याचे काम करु नकोस. अशा शब्दांत पूजानं तिचे कान टोचले होते. आता पुन्हा एकदा पूजा आणि बेबिका धुर्वे चर्चेत आल्या आहेत. त्यात पूजानं परखड शब्दांत तिचा राग व्यक्त केला आहे. बिग बॉस ओटीटी २ मधील लेटेस्ट एपिसोडमध्ये नॉमिनेशन टास्क पार पडला.

# सोनालीचा गारवा डान्स



मराठी मनोरंजन क्षेत्रातील लोकप्रिय अभिनेत्री म्हणजे सोनाली कुलकर्णी. सोनालीची आजवर अनेक गाणी आणि सिनेमे प्रेक्षकांना आवडले आहेत. सोनालीचे डान्स व्हिडीओ प्रेक्षकांना प्रचंड आवडतात. अप्सरा आली असो, मितवा असो अशी अनेक गाणी आणि त्यावर सोनालीने केलेला डान्स आजही प्रेक्षकांच्या स्मरणात आहेत. अशातच सोनाली आणि नृत्यदिग्दर्शिका फुलवा खामकर यांनी खास गारवा डान्स केलाय. जो सर्वांना आवडत आहे. पावसाळ्याचे दिवस सुरु झाले की एक गाणं सर्वांच्या प्लेलिस्ट मध्ये असतंच. ते म्हणजे गारवा. गारवा ऐकलं नाही असा माणुस सापडणार नाही. आज 'गारवा'ला २५ वर्ष पुर्ण झाली आहेत. गारवाला २५ वर्ष पुर्ण झाल्यानिमित्ताने सोनाली - फुलवाने गारवाच्या ओळींवर सुंदर डान्स केलाय. या दोघींच्या गारवा डान्सला प्रेक्षकांनी पसंती दिलीय.

# रिया चक्रवर्तीला मोठा दिलासा!

बॉलिवूडचा लोकप्रिय आणि टॅलेंटेड अभिनेता सुशांत सिंग राजपूत यांच्या मृत्यूला आता जवळपास तीन वर्ष झाले आहेत तरी देखील त्याच्या मृत्यूचं कारण समजू शकलेलं नाही. 14 जून 2020 रोजी मुंबईतील त्याच्या घरी मृतावस्थेत आढळला होता. त्याच्या निधनाने संपूर्ण इंडस्ट्री हादरली. सुशांत सिंह राजपूत प्रकरणात ३ वर्षांनंतर नवा ट्विस्ट येताना दिसत आहे. या प्रकरणी सुशांतची गर्लफ्रेंड आणि अभिनेत्री रिया चक्रवर्ती आणि त्याचा फ्लॅटमेट सिद्धार्थ पिठानी यांना अटक करण्यात आली होती. अनेक दिवस त्यांना तुरुंगात टाकण्यात आले होते. मात्र काही दिवसांनी त्यांची जामिनावर सुटका करण्यात आली होती. आता नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो (NCB)ने सुप्रीम कोर्टाला सांगितले की, ड्रग्जशी संबंधित चौकशीच्या संदर्भात रियावर नोंदवलेल्या खटल्यांमध्ये मुंबई उच्च न्यायालयाने रियाला दिलेल्या जामिनाला NCB आव्हान देणार नाही. मंगळवारी अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एसव्ही राजू यांनी न्यायमूर्ती एएस बोपण्णा आणि एमएम सुंदरेश यांच्या खंडपीठाला सांगितले की, एनसीबी जामिनाला आव्हान देत नाही, परंतु एनडीपीएस) कायद्याच्या कलम 27-ए अंतर्गत या संदर्भात हा केस खुला ठेवावा. रिया चक्रवर्तीला जामीन देण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या ऑक्टोबर 2020 च्या आदेशाविरुद्ध एनसीबीच्या याचिकेवर न्यायालय सुनावणी करत होते. NCB ने रियावर अंमली पदार्थ आणि सायकोट्रॉपिक सबस्टन्स (NDPS) कायद्याच्या कठोर कलम 27-A अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. यात "बेकायदेशीर अंमली पदार्थांच्या तस्करीस मदत करण्यास प्रोत्साहन देणे" यासाठी 10 वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि जामिनावर बंदी घालण्याची तरतूद होती.

# अश्विन जडेजाचा दबदबा



## कसोटी क्रमवारी रोहित टॉप 10 मध्ये दाखल

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**आयसीसीने ताजी कसोटी क्रमवारी जाहीर केली आहे. याचा फायदा भारतीय कर्णधार रोहित शर्माला झाला आहे. फलंदाजी क्रमवारीत रोहित दहाव्या क्रमांकावर पोहोचला आहे. रोहित सध्याच्या यादीत सर्वोच्च रँकिंग असलेला भारतीय फलंदाज बनला आहे.**

अष्टपैलूंच्या क्रमवारीत रविचंद्रन अश्विन आणि गोलंदाजीत रवींद्र जडेजा अव्वल स्थानावर कायम आहेत. टीम इंडियाचा युवा फलंदाज यशस्वी जैस्वाल फलंदाजांच्या क्रमवारीत ७३ व्या क्रमांकावर आहे. यशस्वीचे ४२० रेटिंग गुण आहेत.आयसीसीच्या ताज्या फलंदाजांच्या कसोटी क्रमवारीत रोहित दहाव्या क्रमांकावर आला आहे. पहिल्या दहामध्ये तो एकमेव भारतीय फलंदाज आहे. यामध्ये न्यूझीलंडचा केन विल्यमसन अव्वल स्थानावर आहे. त्याचबरोबर ऑस्ट्रेलियाचा खेळाडू ट्रॅव्हिस हेड दुसऱ्या क्रमांकावर आहे. बाबर आझम तिसऱ्या क्रमांकावर आहे. स्टीव्ह स्मिथ चौथ्या क्रमांकावर तर मार्नस लबुशेन पाचव्या क्रमांकावर आहे. युवा फलंदाज यशस्वी ७३ व्या क्रमांकावर आहे. वेस्ट इंडिजविरुद्धच्या पदार्पणाच्या कसोटीत शानदार कामगिरी करताना त्याने शतक झळकावले.रविचंद्रन अश्विन कसोटी गोलंदाजी क्रमवारीत अव्वल स्थानावर आहे. त्याचे ८८४ रेटिंग गुण आहेत. ऑस्ट्रेलियाचा गोलंदाज पॅट कमिन्स दुसऱ्या क्रमांकावर आहे. तर दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज कागिसो रबाडा तिसऱ्या क्रमांकावर आहे. जेम्स अँडरसन चौथ्या क्रमांकावर आहे. त्याचवेळी पाकिस्तानचा गोलंदाज शाहीन आफ्रिदी पाचव्या क्रमांकावर आहे.



### अष्टपैलूंच्या क्रमवारीत जडेजा अव्वल

कसोटी अष्टपैलूंच्या क्रमवारीत रवींद्र जडेजा अव्वल स्थानावर आहे. जडेजाचे ४४९ रेटिंग गुण आहेत. अश्विन अष्टपैलूंच्या क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्याचे ३६२ रेटिंग गुण आहेत. बांगलादेशचा खेळाडू शाकिब अल हसन तिसऱ्या क्रमांकावर आहे. बेन स्टोक्स चौथ्या क्रमांकावर आहे. भारताचा अष्टपैलू खेळाडू अक्षर पटेल पाचव्या क्रमांकावर आहे. अक्षरचे ३०३ रेटिंग गुण आहेत. सध्या भारत आणि वेस्ट इंडिज संघात दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळली जात आहे. या मालिकेतील पहिला सामना टीम इंडियाने मोठ्या फरकाने जिंकला, ज्याचा फायदा भारतीय संघातील खेळाडूंना झाला आहे.

# ५०० क्लबचा विराट बॉस

## सचिन, पॉंटिंगचे आकडेही कोहलीसमोर फिके

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील उद्यापासून सुरू होणारा दुसरा कसोटी सामना हा भारतीय स्टार विराट कोहलीच्या कारकिर्दीतील 500 वा आंतरराष्ट्रीय सामना असेल. हा टप्पा गाठणारा विराट भारताचा चौथा आणि जगातील 10वा खेळाडू ठरणार आहे. विराटपूर्वी 6 फलंदाज आणि 3 अष्टपैलू खेळाडूंनी 500 हून अधिक आंतरराष्ट्रीय सामने खेळले.**

विशेष बाब म्हणजे तंतोतंत 500 सामने खेळून सर्वाधिक धावा करणाऱ्या स्टार्सच्या यादीत विराट पहिल्या क्रमांकावर असेल. विराटने आतापर्यंत 499 आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. यामध्ये 110 कसोटी, 274 एकदिवसीय आणि 115 टी-20 सामन्यांचा समावेश आहे. या सर्व सामन्यांसह विराटने 53.48 च्या सरासरीने 25,461 धावा केल्या आहेत. यामध्ये त्याने 75 शतके आणि 131 अर्धशतके केली आहेत. या रिपोर्टमध्ये आपण सचिन तेंडुलकर, रिकी पॉंटिंगसह 9 दिग्गजांनी 500 सामन्यांनंतर किती धावा केल्या हे जाणून घेऊ. यासोबतच कोहली 500 व्या सामन्यात कोणते विक्रम मोडू शकतो हे देखील पाहणार आहोत.




### धोनी करू शकला फक्त 16 शतके

भारताचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी 500 क्लबच्या सर्वाधिक धावा करणाऱ्यांच्या यादीत आठव्या क्रमांकावर आहे. धोनीने 500 सामन्यांनंतर 16,330 धावा केल्या होत्या. तो 45.11 च्या सरासरीने धावा करत होता. या सामन्यांमध्ये धोनीला केवळ 16 शतके झळकावता आली.

विराट कोहली 500 सामन्यांमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरणार आहे. त्याने 499 सामन्यांमध्ये सचिन तेंडुलकर, रिकी पॉंटिंग, महेला जयवर्धने, सनथ जयसूर्या आणि जॅक कॅलिस यांसारख्या दिग्गज फलंदाजांना मागे टाकले आहे. कोहलीने आतापर्यंत 25,461 धावा केल्या आहेत. त्याने 53.48 च्या सरासरीने इतक्या धावा केल्या, ते इतर दिग्गजांपेक्षा जास्त आहे. ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पॉंटिंगनेही 500 सामन्यांमध्ये 25,035 धावा केल्या आहेत. कोहलीच्या आतापर्यंत 75 शतके झळकावली आहेत. सचिन तेंडुलकरनेही 500 सामन्यांमध्ये इतकी शतके झळकावली आहेत. म्हणजेच वेस्ट इंडिजविरुद्ध शतक झळकावले तर विराट सचिनला मागे सोडेल.

# आजपासून फिफा महिला विश्वचषक

। सिडनी ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

फिफा महिला विश्वचषक 2023 ही महत्त्वाची स्पर्धा गुरुवार (20 जुलै) पासून सुरू होणार आहे. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड हे या स्पर्धेचे सहयजमान असतील. सलामीच्या लढतीत न्यूझीलंडचा सामना नॉर्वेशी होणार आहे. एकूण 32 संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. 20 ऑगस्ट रोजी सिडनी ऑलिम्पिक स्टेडियमवर अंतिम सामना खेळवला जाईल.

युनायटेड स्टेटस् (यूएसए) फ्रान्समधील स्पर्धेच्या 2019 हंगाम आणि कॅनडामध्ये 2015 ची स्पर्धा जिंकून 'थ्री-पीट' पूर्ण करण्याची आशा करत आहे. युनायटेड स्टेटस् हे महिला सॉकरचे पॉवरहाऊस राहिले आहे. आतापर्यंत कोणत्याही संघाला सलग तीनवेळा फिफा विश्वचषकाचे विजेतेपद पटकावता आलेले नाही. फिफा महिला विश्वचषक 2023 मध्ये 32 संघ असतील. गेल्या वेळी या स्पर्धेत 24 संघ सहभागी झाले होते तर यावेळी आणखी आठ संघ सहभागी होणार आहेत. यावेळी फिफा विश्वचषकासाठी संघांची आठ गटांमध्ये विभागणी करण्यात आली आहे.

यजमान ऑस्ट्रेलियादेखील फेब्रेटमध्ये आहेत आणि चेल्सीची स्ट्रायकर सॅम केरकडे स्टार पॉवर आहे. नेहमीचे संभावित स्पेन, जर्मनी आणि फ्रान्सदेखील अमेरिकन लोकांना आकर्षित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतील; तर 2019 च्या अंतिम फेरीतील नेदरलँडस् गट टप्प्यातदेखील यूएसचा बदला घेण्याचा प्रयत्न करतील. फिफा महिला विश्वचषक 2023 च्या गट टप्प्यातील सामने 20 जुलैपासून सुरू होतील. हे सामने 3 ऑगस्टपर्यंत सुरू राहणार आहेत. यानंतर 5 ऑगस्टपासून 16वी फेरी सुरू होईल.